# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९०००७

E- mail : desk12@dte.org.in/12desk@gmail.com web : http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक : १२/आस्था/(१)/२०१६/३१९२
दिनांक - 4 NOV 2016

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- गट क व गट ड संवर्गातील पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यासंदर्भात

संदर्भ :- १) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पदनि २०१०/८४/१०/विसु-१, दिनांक : २७/०९/२०१०

२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पदनि २०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दिनांक : ०२/०२/२०१३

३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पदनि २०१३/प्र.क्र.११२/१३/ वित्तीय सुधारणा-१, दिनांक : ०२/१२/२०१३

४) संचालनालयाचे पत्र क्र. १२/आस्था(१)/२०१२/४६६१, दि.११/०१/२०१३

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये/अधिनस्त संस्थांमध्ये तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या /अस्थायी/ कार्यालयाचे स्तरावर कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्ध करुन घेतल्या जातात, सदरच्या सेवा नोंदणीकृत एजन्सी मार्फत घेतल्या जात नाही, तसेच अखंड सुरु ठेवल्या जातात अशा रोजंदारीवरील कर्मचा-यांच्या नियुक्त्या दिर्घकाळ चालू राहिल्यामुळे संबंधित कर्मचारी त्यांना सेवेत कायम करण्याची मागणी करतात व त्यांची मागणी मान्य न केल्यामुळे ते मा.औद्योगिक न्यायालयात/कामगार न्यायालयात/महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात /मा.उच्च न्यायालयात दावे दाखल करतात. तसेच सेवा नियमित करण्याबाबत संबंधित कर्मचा-यांकडून सतत शासनाकडे / या कार्यालयाकडे पत्रव्यवहार होत असतो. त्यामुळे **अशा कार्यालयाचे स्तरावरील स्वतः कंत्राटी पध्दतीने घेण्यात आलेल्या सेवा न घेण्याबाबत यापूर्वीच संचालनालयाच्या संदर्भिय क्र.४ च्या पत्रान्वये सर्व विभागीय कार्यालयांना सूचित करण्यात आलेले आहे**, तथापी अद्यापही अशाप्रकारे विभागीय कार्यालयाचे / संस्थांच्या स्तरावरुन कंत्राटी पध्दतीने ज्या सेवा चालू असतील तर, त्या **तात्काळ बंद करण्यात याव्यात**. अन्यथा याबाबत भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुख/कार्यालय प्रमुखाची राहील.

वरील संवर्गातील पदांच्या सेवा हया कंत्राटी स्वरुपात घ्यावयाच्या असतील तर त्या केवळ वित्त विभागाच्या संदर्भिय क्रमांक १ ते ३ च्या परिपत्रकामधील निर्देशानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन बाहय यंत्रणेकडून (Outsourcing ) द्वारे उपलब्ध करुन घेण्यात याव्यात.

आ-३

९६८७

**( डॉ.सुभाष महाजन )**
संचालक,तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य,मुंबई

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
जा.क. विकाऔ/आस्था-३/२०१६/ ८८८०
दिनांक 11 NOV 2016

प्रति
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
उपसचिव, म.रा. तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,
औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/नांदेड/हिंगोली/पु.ला.लातुर/म.नि.लातुर/उस्मानाबाद/बीड

यांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या उपरोक्त पत्रानुसार आपल्या संस्थेत कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्यात आल्या असल्यास त्या तात्काळ बंद करण्यात याव्यात. अन्यथा भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुख/कार्यालय प्रमुख यांची राहील. त्याऐवजी बाहयस्त्रोताकडून (Outsourcing) सेवा घेण्यात याव्यात. याबाबत यापुर्वीही तसे कळविण्यात आलेले आहे.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी